‘‘महाराष्ट्रातील शासकीय जिल्हास्तरीय ग्रंथालयातील विस्तार सेवांचा अभ्यास – एक आढावा’’

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

अंतर्गत

ग्रंथालय व माहितीशास्त्रातील पीएच.डी. (आचार्य) पदवीसाठी सादर केलेला संशोधन आराखडा

* संशोधक *

काळे सचिन भाऊराव

(M.Lib & I.Sc. NET, SET)

* मार्गदर्शक *

डॉ. विलास अशोकराव काळे

ग्रंथपाल

स्वातंत्र्य सैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा. (जं)
ता. पूर्णा जि. परभणी.

—— डिसेंबर २०२० ——

‘‘महाराष्ट्रातील शासकीय जिल्हास्तरीय ग्रंथालयातील विस्तार सेवांचा अभ्यास एक आढावा’’

प्रस्तावना :

ग्रंथालयाचे आधुनिक समाजात विशेषत: शिक्षण, विकास व संशोधनाच्या क्षेत्रात अधिक महत्त्व आहे. आजच्या आधुनिक प्रवाहात प्रचार आणि प्रसाराच्या तांत्रिक विकासामुळे माहितीवर आधारित समाज निर्माण होऊ लागला आहे. ज्याचा मुख्य आधार माहिती व ज्ञान प्राप्त करणे आहे. मागील शतकापूर्वी ग्रंथालयाचा जो सामाजिक उपयोग होत होता तो आजच्या आधुनिक प्रवाहात भिन्न स्वरूपात होत आहे. त्या काळात ग्रंथसंग्रहाचे एक मानसिक समाधान लाभत होते. अलीकडील काळात सामूहिक शिक्षणाच्या उपयोगाकरिता ग्रंथालय निर्माण होऊ लागले आहेत त्यासोबतच ग्रंथालये बुद्धिजीवी, विद्यार्थी, संशोधन यांना मार्गदर्शन करण्याचे कार्य सुद्धा करीत आहे म्हणूनच आधुनिक प्रवाहात सामाजिक नवनिर्माणात ग्रंथालयाचे विशिष्ट स्थान आहे.

शासकीय ग्रंथालय ही आजच्या वर्तमान काळातही स्वयं शिक्षणाचे एक उत्तम साधन आहे. या ग्रंथालयात सर्वच प्रकारे वाचक येत असतात त्यात बाल, तरूण, प्रौढ, संशोधक, अभ्यासक इत्यादींचा समावेश होतो. त्यामुळे सर्वच प्रकारच्या व सर्व स्तरातील वाचन साहित्याचा व साधनांचा समावेश शासकीय ग्रंथालयात करणे क्रमप्राप्त ठरते. स्वातंत्र्य संग्राम काळात स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामोद्धाराची जी चार उद्दिष्टे सर्वमान्य झाली होती त्यात ‘‘गाव तेथे ग्रंथालय’’ या उद्दिष्टांचा अंतर्भाव होता. स्वातंत्र्योत्तर गेल्या साठ वर्षांच्या वाटचालीनंतर या नवीन उद्दिष्टांच्या संदर्भात काय स्थिती आहे हे पाहणे उद्धबोधक आहे. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी व प्रगतीशील समजल्या गेलेल्या राज्यात आज गाव तिथे प्राथमिक शाळा झाली, ग्रामपंचायत झाली. पण गाव तेथे ग्रंथालय मात्र अद्याप झालेले नाही. यामागील कारणांचा शोध घेतला असता ग्रंथालयाचा प्रमुख आधार असलेल्या शासन आणि समाज या दोन्ही घटकांची ग्रंथालया बाबतची उदासीनता हे सर्वांत महत्त्वाचे कारण आहे.

सभ्य आणि शिक्षित समाजात ग्रंथालयाचे महत्त्व ओळखले जाऊ लागले. म्हणूनच ग्रंथालय आज एक महत्त्वपूर्ण सामाजिक संस्था बनली आहेत. ज्यांचा आदर्श

कोणत्याही धार्मिक तीर्थस्थान पेक्षा कमी नाही. ज्या ठिकाणी ग्रंथालये निर्माण झाालीत त्या ठिकाणी समाजाचा सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक विकास शक्य होऊ शकलेला आहे. आज समाजाचे नैतिक अवमूल्यन झाले असल्याचे सर्वमान्य झाले आहे. लोकशिक्षणाचे, समाजप्रबोधनाचे आणि जनजागरणाचे उपक्रम राबवून समाजाचे होत असलेले हे नैतिक अवमूल्यन रोखून समाज उन्नतीचे कार्य ग्रंथालय परिणामकारक करू शकतात. म्हणून शासकीय ग्रंथालयांकडे एक लोकशिक्षणाची ज्ञानगंगोत्री म्हणून पाहिले जाते.

महाराष्ट्रात ग्रंथालय कायदा स्वातंत्र्य प्राप्तीनंतर तब्बल २० वर्षांनी व महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर ७ वर्षांनी १९६७ साली अस्तित्वात आला. ग्रंथालयांसाठी स्वतंत्र कायदा करणारे महाराष्ट्र हे भारतातील चौथे राज्य आहे. महाराष्ट्रात सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम १९६७ ची अंमलबजावणी करण्याकरिता या अधिनियमातील तरतुदीनुसार ''ग्रंथालय संचनालय'' या स्वतंत्र विभागाची स्थापना करण्यात आली आहे. ग्रंथालयाची स्थापना, परीक्षण, संघटन, नियोजन आणि विकास यांची जबाबदारी ग्रंथालय संचानालयाकडे सोपवण्यात आली आहे.

शासकीय ग्रंथालय ही सेवा केंद्रे आहेत. ग्रंथालयातील वाचकांना हव्या असणाऱ्या माहितीसाठी मदत करणे गरजेचे आहे. यासाठी ग्रंथालयाना विस्तार सेवा द्याावी लागते.

व्याख्या :—

१) ''ग्रंथालयात देत असलेल्या देवघेव, संदर्भसूची, आंतरग्रंथालयीन देवघेव, भाषांतर सेवा, झेरॉक्स सेवा इ. सेवा सर्वसामान्य झाल्या आहेत. यापेक्षा इतर दिल्या जाणाऱ्या सेवेला विस्तार सेवा असे म्हणतात.''

२) ''ग्रंथालयाची तोंड ओळख, नवीन ग्रंथांची वेष्टने फलकावर लावणे, वाचक मंडळ, प्रदर्शन भरवणे, भाषणे, व्याख्याने, कृतीसत्राचे आयोजन करणे अशा प्रकारच्या सेवांना विस्तार सेवा असे म्हणतात.''

३) डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या मते,

"A part from such methods of pure publicity, libraries are now day developing certain new types of work which, in addition to their being directly educative or recreational, lead also to publicity as an important secondary Product. "These activities are named as the extension Services of Libraries."

४) कृष्ण कुमार यांच्या मते,

"An extension service aims of converting non-readers in to readers. It creates & stimulates the desire for good reading. This is done by bringing books & readers together. This results in exploitation & promotion of collections. Mc Colvin considers it an means "to increase the number of readers & the volumes of work & later to make the library more useful to more people."

वाचकांना उत्तेजन देण्यासाठी, ग्रंथालय सभासदत्व प्राप्त करून देण्यासाठी शासकीय ग्रंथालयात विस्तार सेवेची आवश्यकता आहे.

विषय :

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत ग्रंथालय व माहितीशास्त्रातील आचार्य (पीएचडी) शिक्षणक्रमासाठी असलेल्या संशोधन प्रकल्पाकरिता संशोधकाने 'महाराष्ट्रातील शासकीय जिल्हास्तरीय ग्रंथालयातील विस्तार सेवांचा अभ्यास – एक आढावा'' हा विषय निवडला आहे.

पूर्व साहित्याचा अभ्यास :

शासकीय ग्रंथालयाचा उद्देश संपूर्णत: सामाजिक आहे. ग्रंथालय प्रत्येक धर्म समुदाय व्यवसाय वय इ. ची समान रूपात सेवा करते. या प्रकारच्या ग्रंथालयात संग्रहित संग्रहाचा उपयोग करण्याचा समान अधिकार समाजातील प्रत्येक व्यक्तीला आहे. यावरून हे सिद्ध होते की शासकीय ग्रंथालय ही एक सामाजिक संस्था आहे. राज्य शासनाने जनतेच्या उपयोगासाठी स्थापन केलेल्या व स्वत: चालवलेल्या शासकीय मध्यवर्ती ग्रंथालय तसेच शासकीय विभागीय ग्रंथालय, शासकीय जिल्हा

ग्रंथालये यांच्या माध्यमातून राज्यातील ग्रंथाचा संग्रह करून कायमस्वरूपी एक सांस्कृतिक ठेवा राष्ट्रीय संपत्ती म्हणून जतन करणे आणि आवश्यकतेनुसार जनतेला उपलब्ध करून देण्याचे कार्य केले जाते.

शिक्षण आणि साक्षरता जोपासण्याच्या उद्देशाने प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी शासकीय ग्रंथालयाची निर्मिती महराष्ट्रात करण्यात आली. यानुसार महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यासाठी एक शासकीय जिल्हा ग्रंथालय स्थापन करण्यात आली आहेत. ग्रंथालय वाणीच्या विविध योजनांची माहिती जिल्ह्यातील ग्रंथालयांना देणे या योजनांचा जास्तीत जास्त लाभ जिल्ह्यातील ग्रंथालयांना मिळनू देण्यासाठी मार्गदर्शन करणे यासाठी ग्रंथालयाचा पुढाकार अपेक्षित आहे. ''गाव तेथे ग्रंथालय'' हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी उपभोक्त्याला हवी असलेली माहिती मिळवण्यास मदत करणे आवश्यक आहे.

ग्रंथालय ही सेवा केंद्रे आहेत. संदर्भ सेवा तर नेहमीच मदतीला असते अशा तऱ्हेने देवघेव सेवा, संदर्भ सेवा, आंतरग्रंथालयीन देवघेव, भाषांतर सेवा इत्यादी सेवा ह्या नेहमीच्याच सेवा आहेत. यापेक्षा वेगळ्या सेवा ग्रंथालयार्मात दिल्या जातात त्यांना विस्तारित सेवा म्हणतात. अशा सेवांची माहिती वाचकाला व्हावी व त्यांच्या गुणवत्तावाढीचा विकास कशा प्रकारे करता येईल याचा शोध घेण्यासाठी सदर संशोधन प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

उद्दिष्टे :

कोणत्याही संशोधन प्रकल्पाची काही उद्दिष्टे असतात. उद्दिष्टे संशोधन प्रकल्प निवडताना ठरवावी लागतात. उद्दिष्टा शिवाय संशोधन पूर्ण होत नसते. प्रस्तुत संशोधन विषय मागची जी उद्दिष्टे आहेत ती खालील प्रमाणे,

१. महाराष्ट्रातील शासकीय जिल्हा ग्रंथालयाच्या सद्यस्थितीचा आढावा घेणे.

२. ग्रंथालयामार्फत दिल्या जाणाऱ्या विविध विस्तारित सेवांचा शोध घेणे.

३. शासकीय ग्रंथालयांचा प्रसार होण्यासाठी जनसंपर्काची साधने, संप्रेक्षणाची साधने, ज्ञान मनोरंजनाचे केंद्र म्हणून योगदान लक्षात घेणे.

४. शासकीय जिल्हास्तरीय ग्रंथालयाचे संगणकीकरण झाले आहे का याचा शोध घेणे.

गृहीतके :

१. जिल्हास्तरीय शासकीय ग्रंथालयामार्फत वेगवेगळ्या विस्तार सेवा दिल्या जातात.

२. शासकीय ग्रंथालयाचा जनसंपर्क वाढवण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवले जातात.

३. शासकीय ग्रंथालयात पायाभूत सुविधांचा अभाव दिसून येतो.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधन प्रकल्पात वर्णनात्मक संशोधन पद्धती अंतर्गत केस स्टडीचा वापर करण्यात येणार आहे. तसेच संशोधन प्रक्रियेत तथ्य संकलनाची साधने व तंत्रे म्हणून प्रश्नावली व मुलाखतीचा वापर करण्यात येणार आहे.

ग्रंथपालन व्यवसायातून विषयाचे महत्त्व :

शासकीय ग्रंथालय ही एक सामाजिक संस्था आहे. या ग्रंथालयात वाचकांचा एक मोठा समूह असतो. शासकीय ग्रंथालयात दिल्या जाणाऱ्या विस्तारित सेवा या आजच्या काळाची गरज आहे. ग्रंथालयाने वाचकांना हव्या असणाऱ्या माहितीसाठी मदत करणे गरजेचे आहे. यासाठी ग्रंथालयांनी निर्णयाची साधने व तंत्रे विकसित करावयास हवी. ग्रंथालय देत असलेल्या देवघेव, संदर्भसूची, आंतरग्रंथालयीन सेवा या सर्वसामान्य झाल्या आहेत. यापेक्षा वेगळ्या दिल्या जाणाऱ्या सेवा या विस्तारीत सेवा आहेत त्यात नवीन खरेदी केलेल्या वाचन साहित्याचे प्रदर्शन भरवणे, शासकीय ग्रंथालयाची तोंड ओळख करून देणे, नवीन ग्रंथांची वेष्टने फलकावर लावणे अशा अनेक विस्तारित सेवा शासकीय ग्रंथालय करत असते. वाचकांना उत्तेजन देण्यासाठी अनेक ग्रंथालयांना व ग्रंथपालांना अभ्यासासाठी याचा उपयोग होणार आहे.

व्याप्ती व मर्यादा :

प्रस्तुत संशोधन प्रकल्प ''महाराष्ट्रातील शासकीय जिल्हास्तरीय ग्रंथालयातील विस्तार सेवांचा अभ्यास – एक आढावा'' हा असून महाराष्ट्रातील अहमदनगर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, जालना, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, उस्मानाबाद, कोल्हापुर, गडचिरोली, गोंदिया, जळगाव, नवी मुंबई, धुळे, नंदुरबार, नाशिक, पुणे, मुंबई उपनगर, मुंबई शहर, अलीबाग (रायगड), रत्नागिरी, वाशिम, सांगली, सातारा, सिंधुदूर्ग, सोलापुर, चंद्रपुर, नागपुर, भंडारा, बुलढाणा, वर्धा, यवतमाळ या ३५ शासकीय जिल्हा ग्रंथालयात देण्यात येणाऱ्या विस्तार सेवांच्या अभ्यासापुरता मर्यादित आहे.

अनुक्रमणिका

- प्रकरण पहिले

  प्रस्तावना

- प्रकरण दुसरे

  पूर्व साहित्याचा अभ्यास

- प्रकरण तिसरे

  शासकीय जिल्हास्तरीय ग्रंथालयातील विस्तार सेवांचा आढावा

- प्रकरण चौथे

  शासकीय जिल्हा ग्रंथालयाची माहिती विश्लेषण

- प्रकरण पाचवे

  निष्कर्ष व शिफारसी

- परिशिष्टे

  संदर्भ ग्रंथ सूची

  प्रश्नावली

  छायाचित्रे

  नकाशे

प्रस्तावित कार्य योजना

अ.क्र.	कामाचे स्वरूप	प्रस्तावित कालावधी
१	संशोधना संबंधित साहित्यसंग्रह	६ महिने
२	महाराष्ट्रातील शासकीय जिल्हा ग्रंथालयांना भेट देणे आणि प्रश्नावली तयार करणे	६ महिने
३	माहिती संग्रह आणि मुलाखती	६ महिने
४	माहितीचे विश्लेषण आणि व्याख्या	६ महिने
५	प्रबंध लेखन	६ महिने
६	प्रबंध प्रस्तुतीकरण	६ महिने

संदर्भ ग्रंथ सूची

१) कऱ्हाडे, पी.एम. २००७ सामाजिक संशोधन पद्धती, नागपूर : पिंपळपुरे प्रकाशन.

२) काचोळे दा.धो. २००५ समाजातील संशोधन पद्धती, औरंगाबाद : कैलास प्रकाशन.

३) घोरमोडे, के.यु. आणि घोरमोडे कला, २००८, शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, नागपूर : विद्या प्रकाशन.

४) जैन, प्रकाश, डाखोळे, प्रमोद, सुलभ ग्रंथलयशास्त्र : विश्व प्रकाशन नागपूर.

५) निकोसे सत्यप्रकाश २००७, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पद्धती, नागपूर : प्रज्ञा प्रकाशन.

६) पवार, पी.एस. आणि इतर, २००२, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र, कोल्हापूर : फडके प्रकाशन.

७) पाटील, वा.भा. १९९८ संशोधन पद्धती नागपूर : मंगेश प्रकाशन

८) पंडीत, बन्सी, १९८९, शिक्षणातील अधिकल्प, पुणे : नूतन प्रकाशन.

९) भितांडे, वि.रा., २००५ शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे : नूतन प्रकाशन.

१०) रिसवडकर म.रा. २००० संशोधन व्याख्या आणि पद्धती, नाशिक : य.च.म.मु. विद्यापीठ.

११) वाचनसाहित्य संग्रहाचा विकास : अनुवादक डॉ. राजेंद्र कुंभार.

१२) वीर, धर्मराज, ग्रंथपरिवार सार्वजनिक ग्रंथालयातील संग्रह विकास, २००४.

१३) शर्मा एस.के., २००१, विशिष्ट ग्रंथालय एवं शोध पद्धतीशास्त्र, कानपूर : पराग प्रकाशन.

१४) सार्वजनिक ग्रंथालये, नाशिक : य.च.म.मु. विद्यापीठ.

१५) सार्वजनिक ग्रंथालये, ज्ञानगंगोत्री, नाशिक : य.च.म.मु. विद्यापीठ.

१६) संत, दु.का., १९८८ संशोधन पद्धती, प्रक्रिया व अंतरंग पुणे : पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन.

१७) ज्ञानगंगोत्री, सार्वजनिक ग्रंथालये : काही विचार, : नाशिक य.च.म.मु. विदयापीठ.

१८) Gopal, M.H. 1970, AN Introduction to Research Procedyre in Scial Science, Bombay : Aisa Pub. Huirse.

१९) Kothari C.R. 1985, Research Methodology Methods Techniques, Jaipur : Vishwa Publication.

२०) Sidhu, Kulbirsingh, 1992, Methodology of Research in Education, New Delhi : Steerling Publication. Pvt.

२१) http://dolmaharashtra.org.in

२२) http://dolmaharashtra.org.ingranthalay-sanchnalaya.

२३) www.studycircle.co.in

२४) www.wwjmrd.com

संशोधकाची स्वाक्षरी

श्री. काळे सचिन भाऊराव

(M.Lib & I.Sc. NET, SET)

मार्गदर्शकाची स्वाक्षरी

डॉ. विलास अ. काळे.

(ग्रंथपाल)

स्वातंत्र्य सैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालय,

पूर्णा (जं) ता. पूर्णा जि. परभणी.